bluebytes
news that matters

संध्यानंद

Thursday, July 08, 2010

**‘Government not serious against tobacco close' says Doctor**

Publication: Sandhyanand, Edition: Pune, Journalist: Bureau, Page No: 9, Location: Middle-Right, Width(cms): 8, Height(cms): 9, Size(sq.cms): 72

# “ सरकार तंबाखू बंदीबद्दल अजिबात गंभीर नाही” : डॉक्टर म्हणतात

तंबाखू उत्पादनाच्या आवरणावर (लेबल्स) छापणाऱ्या धोक्याच्या सूचना आणि तंबाखू उत्पादनांवर पूर्ण बंदी घालण्यातली सरकारची उदासीनता यावर तंबाखू विरोधी चळवळीतल्या तज्ज्ञांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तंबाखू विरोधी धोरण आणि कायदे प्रभावीपणे राबवण्यात सरकारला भाग पाडण्यासाठी तीन दिवसांचं एक सेमिनार मुंबईत पार पडलं. ‘अॅडव्होक्सी फोरम फॉर टोबॅको कंट्रोल’ (AFTC) या तंबाखू नियंत्रण संघटनांच्या शिखर परिषदेने हे सेमिनार आयोजित केलं होतं. “या विषयावर केंद्रीय आरोग्य मंत्र्यांना आम्ही कळवणार आहोत. याचं कारण तंबाखू संदर्भातील नियम जाहीरपणे धुडकावले जात आहेत. अप्रत्यक्षपणे तंबाखू उत्पादनांच्या जाहिराती दाखवल्या जात आहेत आणि तरीही त्याविरोधात काहीच कारवाई केली जात नाही. हे सगळे मुद्दे आरोग्य मंत्र्यांना ठळकपणे कळवणार आहोत”, असं हेलिस सेखसरिया इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थ’चे डायरेक्टर डॉ. प्रकाश गुप्ता यांनी सांगितलं. ही संस्था AFTC ची सदस्य आहे. “तंबाखू उत्पादनांवर धोक्याच्या सूचना ज्याप्रकारे छापल्या जात आहेत त्याबद्दल आम्ही समाधानी नाही”, असं टाटा मेमोरिअल हॉस्पिटलचे डॉ. शास्त्री म्हणाले.